**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**माहिती व जनसंपर्क विभाग**
**प्रसिद्धीपत्रक**

## ❖ पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत मिरा भाईंदर महापालिकेचा दोन दिवसीय अभ्यासदौरा

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा दोन दिवसीय अभ्यासदौरा दिनांक 23 आणि 24 मे 2025 रोजी आयोजित करण्यात आला. या अभ्यासदौऱ्याचा उद्देश म्हणजे शहरी विकास, स्वच्छता, पर्यावरणपूरक उपाययोजना, पायाभूत सुविधा, अपंगजनांच्या सेवा, शिक्षण, आरोग्य, माहिती-तंत्रज्ञान या क्षेत्रांतील प्रभावी प्रकल्पांचा अभ्यास करून ते मिरा भाईंदर शहरात प्रभावीपणे अंमलात आणणे हा आहे.

या अभ्यासदौऱ्यात पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील विविध प्रकल्प व सुविधांना भेट, घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत वापरण्यात येणाऱ्या अद्ययावत सामग्री पुनर्प्राप्ती केंद्रास भेट, कचरा वर्गीकरण, ट्रान्स्फर स्टेशन, घरगुती घातक कचरा प्रकल्प व मल: निसारण प्रक्रिया केंद्र, सार्वजनिक स्वच्छतेसाठी उभारण्यात आलेल्या 'नवी दिशा' या आधुनिक स्वच्छतागृह प्रकल्पाची पाहणी, पर्यावरणपूरक 'हरित सेतू' तसेच नागरिकांसाठी विकसित करण्यात आलेल्या 'जिजाऊ गार्डन' मध्ये समाविष्ट डायनासोर पार्क आणि लिनीअर गार्डन उपक्रम, कीवळे विभागीय कार्यालय व बांधकाम सुविधांचे नियोजन, दिव्यांग नागरिकांसाठी विकसित करण्यात आलेल्या 'दिव्यांग भवन' , थेरगाव येथील सर्वसुविधायुक्त रुग्णालय, मुलांना विज्ञानात गोडी निर्माण करणाऱ्या 'सायन्स पार्क' आणि निगडी येथील 'लाइटहाऊस' प्रकल्पाची सविस्तर माहिती घेतली जाणार आहे.

या अभ्यासदौऱ्यात पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने विविध सादरीकरणांद्वारे महत्त्वपूर्ण उपक्रम सविस्तरपणे मांडण्यात येणार आहे. मालमत्ता कर सुधारणा उपक्रम, दिव्यांग कल्याण योजनांची अंमलबजावणी, घनकचरा व्यवस्थापनातील नवकल्पना, शाश्वत वाहतूक व्यवस्था, शिक्षण क्षेत्रातील नावीन्यपूर्ण उपक्रम, आरोग्य विभागाची कार्यप्रणाली, तळवडे जैवविविधता उद्यानाचे व्यवस्थापन, शहरात वापरण्यात येणारे GIS ERP व RAMS मॉडेल, तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून अवैध जाहिरात फलक शोध प्रणाली याची माहिती देण्यात येणार आहे. यासोबतच CHDC प्रकल्प, सक्षम महिला बचत गट योजनेचा अंमल, बांधकाम सुविधा प्रकल्प व लाइटहाऊस उपक्रम यांचाही आढावा घेण्यात येणार आहे.

या अभ्यासदौऱ्याद्वारे शहरी प्रशासनातील नाविन्यपूर्ण उपाययोजनांचा अनुभव घेऊन, त्या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या क्षेत्रात राबविण्यासाठी अधिकारीवर्गाला उपयुक्त दिशादर्शन मिळणार असून नागरिकाभिमुख सेवा, पर्यावरणपूरक विकास आणि तंत्रज्ञानावर आधारित प्रशासन याकडे वाटचाल करण्याच्या दृष्टीने हा अभ्यासदौरा मोलाचा ठरणार आहे.